
# सांस्कृतिक गोवा : काल, आज आणि उद्या

**कोणत्याही प्रदेशाची सांस्कृतिक स्थितिगती ही कायम एकसारखी टिकून राहणे शक्य नसते. गोवाही याला अपवाद असू शकत नाही. 'काल'च्या गोव्यामधील मानवी समाज प्रामुख्याने तीन भागात विभागलेला होता. हिंदू, ख्रिस्ती आणि मुसलमान; मात्र आजचा गोमंतकस्थित समाज यापेक्षा अधिक समाजांमध्ये विभागलेला आहे. आजचा गोमंतकीय समाज 'मिनी इंडिया' बनलेला आहे, तर 'उद्या'चा गोवा जगाचे 'मिनिएचर रूप' बनण्याच्या दिशेने वाटचाल करीत आहे.**

भारताच्या पश्चिम किनारपट्टीवर वसलेले गोवा हे भारताचे एक घटक राज्य आहे. १९८७ मध्ये त्याला घटक राज्याचा दर्जा मिळाला. तत्पूर्वी तो एक संघ प्रदेश होता. १९६१ पूर्वी गोवा, पोर्तुगीज गोवा म्हणून ओळखला जायचे. गोव्याचा हा नजीकचा इतिहास महत्त्वाचा अशाकरिता आहे, की त्याच्या ज्ञानाविना सांस्कृतिक गोव्याचे आकलन होणे कठीण जाईल. जेव्हा मी सांस्कृतिक गोवा : काल, आज आणि उद्या असे म्हणतो, तेव्हा मला गोव्याची भूतकालीन, वर्तमानकालीन व भविष्यकालीन सांस्कृतिक स्थितिगती याविषयी संकेत करावयाचा आहे. कोणत्याही प्रदेशाची सांस्कृतिक स्थितिगती ही कायम एकसारखी टिकून राहणे शक्य नसते. कारण 'संस्कृती' ही मानवी समाजाची निर्मिती असते. मानवी समाजाला इतिहासाच्या प्रवाहात भरती-ओहोटीला सामोरे जावेच लागते. गोव्यातील मानवी समाजही याला अपवाद असू शकत नाही.

**गोव्यातील कला-संस्कृती अनेक गावांतील मंदिरे, चर्च व मशिदींच्या रूपाने पाहायला मिळते. गोव्यातील सण-समारंभ, नृत्य-नाट्य ही संस्कृतीची अंगेदेखील याची साक्ष देतात.**

गोव्यासंदर्भात वर तीन कालखंड जे कल्पिलेले आहेत त्याला ऐतिहासिक आधार आहे. 'काल'चा गोवा म्हणजे पोर्तुगीजकालीन किंवा १९६१ पर्यंतचे गोवा. 'आज'चा गोवा म्हणजे सांप्रतकालीन गोवा आणि 'उद्या'चा गोवा म्हणजे ग्लोबलायझेशनयुगातील गोवा. 'काल'च्या गोव्याची संस्कृती आणि 'आज'च्या गोव्याची संस्कृती एकसारखीच आहे, असे निखालस म्हणता येणार नाही; कारण 'काल'च्या गोव्यामधील मानवी समाज प्रामुख्याने तीन भागात विभागलेला होता. हिंदू, ख्रिस्ती आणि मुसलमान; मात्र 'आज'चा गोमंतकस्थित मानवी समाज यापेक्षा अधिक मानवी समाजांमध्ये विभागलेला आहे. धार्मिकदृष्ट्या हे मानवी समाज प्रामुख्याने वरील तीन समाजांतर्गत जरी असले तरी देश-प्रदेशपरत्वे ते भिन्नभिन्न आहेत आणि म्हणूनच त्यांची संस्कृतीदेखील काहीशी भिन्न असल्याचे





आढळून येते. आजचा गोमंतकीय समाज हा 'मिनी इंडिया' बनलेला आहे, तर 'उद्या'चा गोवा जगाचे 'मिनिएचर रूप' बनण्याच्या दिशेने वाटचाल करत असल्याचे जाणवते आहे.

'काल'चा सांस्कृतिक गोवा पाहायचा असेल, तर गोव्याच्या अंतर्गत भागात म्हणजे, पेडणे ते काणकोण व सत्तरी ते फोंडा येथे आजही अवशेषरूपात हा गोवा पाहता येईल. 'आज'चा सांस्कृतिक गोवा पाहायचा असेल, तर गोव्यातील छोटी-मोठी नगरे आणि उपनगरे यांच्या सभोवतीने हा गोवा पाहता येईल आणि 'उद्या'चा सांस्कृतिक गोवा तुम्हाला पाहायचा असेल, तर उत्तर गोव्याच्या किनारपट्टीवरील कळंगुट-बागा, कांदोळी, हणजूण, शापोरा, मोरजी इ. गावांतून त्याची झलक तुम्हाला पाहता येईल. 'काल'चा सांस्कृतिक गोवा, धर्मकेंद्रित होता. 'आज'चा सांस्कृतिक गोवा, वाणिज्यकेंद्रित आहे, तर 'उद्या'चा गोवा माफियाकेंद्रित असेल.

'काल'च्या सांस्कृतिक गोव्यातील कला-संस्कृती ही धर्माच्या आधाराने बहरली. याचे पुरावे व दाखले गोव्यातील अनेक गावांतून आजही मंदिरे, चर्च व मशिदींच्या रूपाने पाहायला मिळतात. तिथले सण-समारंभ, नृत्य-नाट्य ही संस्कृतीची अंगेदेखील याची साक्ष देतील. इथल्या विविध प्रकारच्या जत्रा, रणमाले, जागर, धाला, कातयो, उरुस, फेस्त, लादीन, तियात्र, दशावतार, धोंड व गड्यांच्या जत्रा, काला, चिखलकाला, सागरपूजा, रोंबट, इत्रूज, अल्लाओ आदींमधून हे कालचे सांस्कृतिक गोवा आजही बऱ्याच प्रमाणात टिकून आहे.

आजचे सांस्कृतिक गोवा पाहायचे असेल तर सरकारी शिमगोत्सव, कार्निवल उत्सव, नरकासुर स्पर्धा, गरबा व दांडिया स्पर्धा, दहीहंडी स्पर्धा, षट्पूजा, सार्वजनिक गणेशोत्सव, दुर्गापूजा, पोंगल, ओणम पूजा, शॅकची दुकाने इ. रेलचेल इथे चाललेली दिसून येईल.

उद्याचे सांस्कृतिक गोवा हे इव्हेंट मॅनेजमेंटचे गोवा असेल. देशी-विदेशी स्पर्धा व स्पर्धक त्याचे शिल्पकार असतील. लुसोफोनिया गेम्स ही त्याची झलक म्हणावी लागेल. त्याचप्रमाणे हणजुणे येथे भरणारा संडे बझार हे त्याचेच एक छोटे रूप म्हणता येईल; तसेच मोरजी गावात रशियन लोकांनी थाटलेली दुकाने व बागा, कळंगुटमधील इस्रायलींचा व्यापार, नायजेरियन व केनियन लोकांचा अमली पदार्थांचा व्यापार, गोव्याच्या सुंदर समुद्र किनाऱ्याला बदनाम करणारा देहविक्रयासारखा धंदा, सनबर्न पार्टीसारखे इव्हेंट ही सारी उद्याच्या सांस्कृतिक गोव्याची अविभाज्य अंगे आहेत.

गोव्यात येऊन काय पाहाल व कसे पाहाल हे सर्वस्वी इथे येणाऱ्या पर्यटकांवर, त्यांच्या अभिरुचीवर व संस्कारसंपन्नतेवर, तसेच चारित्र्यावर निर्भर करणारे आहे. स्वच्छ व निर्मळ मनाने, मेंदूने येणारा कोणीही पर्यटक इथून विन्मुख जाणार नाही, याची काळजी आजचे गोवा निश्चितपणे घेईल. निदान आजपर्यंत तरी गोव्यात येणाऱ्या पर्यटक पाहुण्यांचे आगत-स्वागत करायचा अधिकार आजच्या मूळ गोवेकराचांच आहे. उद्याचे कुणी सांगावे? गोव्याचे आजपर्यंतचे संपन्न व समृद्ध असे सांस्कृतिक दायजच त्याची योग्य ती काळजी घेईल, अशी अपेक्षा करूयात. ■

